रक्तदानजीवनदान

महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव

# Government Medical College & Hospital, Jalgaon

Jilhapeth, Govt. Hospital Campus, Jalgaon – 425001, M.S. (INDIA)
Telephone & Fax No. 0257- 2232390
Email- deangmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शावैमवरुज/आस्था-राजप (१ व २)/कंत्राटी/वै.अधि./ता.नि./७५२३ /२०२२ दि.१९/०५/२०२२

**वेबसाईटद्वारे प्रसिध्द (WWW.gmcjalgaon.org)**

## " वैद्यकीय अधिकारी या पदावर थेट मुलाखत "

## (Medical Officer Walk in Interview)

दैनंदिन रुग्णसेवेची निकड लक्षात घेता त्या दृष्टीने अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव आस्थापनेवरील "वैद्यकीय अधिकारी" यांची रिक्त पदे निव्वळ १२० दिवसांच्या कालावधीकरीता कंत्राटी तत्वावर भरण्याकरीता एकुण ०६ रिक्त पदे भरण्यासाठी पात्रताधारक उमेदवारांची थेट मुलाखत आयोजित करण्यात येत आहे.

| वैद्यकीय अधिकारी पदांच्या रिक्त जागा :- एकुण - ०६ | | |
|---|---|---|
| शैक्षणिक अर्हता | :- | एम.बी.बी.एस. व शासन निकषानुसार नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता |
| मुलाखत दिनांक व वेळ | :- | दि.२३/०५/२०२२ ते दि.२७/०५/२०२२ रोजीपर्यंत दररोज सकाळी ११.०० ते दुपारी ०१.०० वाजेपर्यंत. (शासकीय सुट्टीचे दिवस वगळुन) |
| मुलाखत ठिकाण | :- | मा.अधिष्ठाता यांचे दालन, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगाव. |
| वेतन | :- | रु.७५०००/- ठोक मानधन दरमहा |

नियम व अटी :-

१) उमेदवाराने सदरहू पदासाठी विहित नमुन्यातील अर्ज या कार्यालयाच्या **(WWW.gmcjalgaon.org)** संकेत स्थळावरुन डाऊनलोड करुन घेण्यात यावा. तसेच सदरील अर्ज परिपुर्ण भरुन मुलाखतीच्या दिनांकास अर्ज शुल्क म्हणुन या कार्यालयाच्या रोख शाखेमध्ये २५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास मात्र) भरणा करावे व सदरील भरणा केलेल्या शुल्काची पावती अर्जा सोबत जोडण्यात येऊन मुलाखतीस उपस्थित रहावे.

२) वैद्यकीय अधिकारी पदाची वेतनश्रेणी:- सदरील उमेदवारांना दि.३१/१२/२०२० च्या शासन निर्णयातील तरतुदीनुसार एम.बी.बी.एस अर्हताधारक यांना रु. ७५,०००/- (अक्षरी रुपये पंच्याहत्तर हजार मात्र) इतके ठोक मानधन दरमहा अनुज्ञेय राहील. सदरील वेतन संस्थेत मंजूर असलेल्या मूळ अनुदानातून १० कंत्राटी सेवा या उद्दीष्ठांमधून भागविण्यात येईल.

३) वयोमर्यादा:- उमेदवाराचे वय ४० वर्षापेक्षा अधिक असणार नाही. परंतु जे उमेदवार अगोदर शासनाच्या सेवेत असतील अशा उमेदवाराच्या बाबतीत, उच्च वयोमर्यादा ५ वर्षापर्यंत शिथिल करता येईल. तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी ४५ वर्षापर्यंत शिथिलक्षम राहील.

४) गुणवत्ता यादी ही पदवी व पदव्युत्तर पदवी परीक्षेच्या एम.बी.बी.एस./एमडी समतुल्य अर्हता प्राप्त परीक्षेच्या गुणांवर ठरविण्यात येईल. तसेच सदर पदाचा अनुभव असल्यास प्राधान्य देण्यात येईल.

५) उपरोक्त जाहिरातीमध्ये वैद्यकीय अधिकारी यांच्या रिक्त जागेमध्ये बदल होण्याची शक्यता आहे. जाहीरातीत प्रसिध्द करण्यात आलेली पदसंख्या कमी किंवा वाढविण्याचे तसेच सदरहू थेट मुलाखत प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी राखुन ठेवलेले आहेत.

Scanned by CamScanner

६) उमेदवार या संस्थे व्यतीरिक्त इतर संस्थेत कार्यरत असल्यास संस्थाप्रमुखांचे ना-हरकत प्रमाणपत्र अर्जासोबत जोडणे बंधनकारक राहील.

७) ज्या उमेदवारांची निवड करण्यात आली असेल व ते कार्यरत असतांना सतत जास्त कालावधी पर्यंत गैरहजर असल्यास किंवा त्यांचे काम समाधानकारक नसल्यास त्यांची कंत्राटी नियुक्ती तात्काळ समाप्त करण्यात येईल.

८) उमेदवाराची निवड करतांना ज्या उमेदवारांनी बंधपत्रित सेवा (पीजी बॉन्ड) पूर्ण केला नाही अशा उमेदवारांचा प्राधान्याने विचार करण्यात येईल.

९) सदर पदांकरीता उमेदवारांची नियुक्ती निव्वळ १२० दिवसांसाठी अत्यंत तातपूरत्या स्वरुपात कंत्राटी स्वरुपात राहील. १२० दिवसानंतर रिक्तपद उपलब्ध असल्यास तांत्रिक खंड देऊन पुन्हा १२० दिवसांसाठी नियुक्तीकरीता विचार करण्यात येईल.

१०) उमेदवाराची कागदपत्रे परिपूर्ण नसल्यास अर्जाचा विचार केला जाणार नाही. वरील पदांकरीता नियुक्ती तात्पुरत्या स्वरुपात १२०/१२० दिवसांसाठी असून, कोणतीही पूर्व सूचना न देता तात्पुरती कंत्राटी सेवा समाप्त करण्यात येईल. तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत किंवा इतर वैद्यकीय महाविद्यालयातून बदलीने उमेदवार रुजू झाल्यास व संबंधित विषयात रिक्तपद उपलब्ध नसल्यास उमेदवाराची सेवा तात्काळ समाप्त करण्यात येईल.

११) प्रत्यक्ष मुलाखतीस उमेदवारांनी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

१२) निवड झालेल्या उमेदवारास शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव संस्थेतील कोणत्याही सलग्न रुग्णालयात नेमणूक केली जाईल व काम करावे लागेल व प्रशासनास आवश्यकता असल्यास यापैकी कोणतेही रुग्णालयात नेमणूकीत बदल होऊ शकेल. अर्जासोबत प्रमाणपत्रांच्या छायांप्रती साक्षांकित करुन जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्जाचा विचार केला जाणार नाही. नंतर कोणतीही कागदपत्रे स्विकारली जाणार नाहीत.

१३) सदर पदावर कार्यरत असतांना आपणास खाजगी व्यवसाय करता येणार नाही.

१४) सदर नियुक्ती ही अत्यंत तात्पूरत्या स्वरुपात असल्यामुळे आपणास या पदावर कायम स्वरुपाचे कोणतेही हक्क राहणार नाही व कायम नियुक्तीचे कोणतेही फायदे अनुज्ञेय नसतील.

१५) (अ) प्रथम द्वितीय व तृतीय वर्ष एम.बी.बी.एस. किंवा एम.डी., एम.एस. किंवा समतुल्य या सर्व परिक्षेची गुणपत्रिका व प्रयत्न प्रमाणपत्रे गुणपत्रिका नसल्यास परीक्षा पॉईट, ग्रेड प्रमाणपत्र. (ब) सर्व पदवी, पदविका व पदव्युत्तर पदवी परीक्षेची डिग्री प्रमाणपत्रे व अंतिम वर्षाची गुणपत्रिका (क) एम.एम.सी. किंवा एम.सी.आय. नुतनीकरण केलेली नोंदणी प्रमाणपत्र. (ड) जातीचे प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र व आवश्यक असल्यास नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्र. (ई) जन्म दाखला/शाळा/महाविद्यालय सोडल्याचा दाखला. (फ) पॅनकार्ड व आधारकार्डची छायाप्रत इत्यादी कागदपत्रे/प्रमाणपत्राचा एक छायांकित संच अर्जासोबत सादर करणे आवश्यक राहील.

१६) उमेदवारांनी सदरील पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास किंवा सदरची सेवा सोडावयाची असल्यास एक महिना पुर्व लेखी सुचना देणे आवश्यक आहे किंवा एक महिन्याचे वेतन शासनास ठरविलेल्या इतर भत्यासह भरणे बंधकारक राहील.

(डॉ जयप्रकाश रामानंद)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव

प्रति,
१) अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, मुंबई, पुणे, सोलापूर, कोल्हापूर, अंबाजोगाई, लातूर, मिरज, नांदेड, अकोला, यवतमाळ, नागपूर, धुळे, औरंगाबाद, चंद्रपूर, गोंदिया, बारामती, नंदुरबार, सिधुदुर्ग, अलिबाग, सातारा, उस्मानाबाद.
२) वैद्यकीय अधिक्षक, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, जळगांव.
३) सूचना फलक, अधिष्ठाता कार्यालय/विद्यार्थी वसतीगृह/बाहयरुग्ण विभाग, मुलींचे वसतीगृह/मध्यवर्ती वैद्यकीय संदर्भ ग्रंथालय, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव.
४) रोखपाल, रोखपाल शाखा, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय/रुग्णालय, जळगांव यांना आदेशीत करण्यात येते की, त्यांनी इच्छुक उमेदवारांकडुन (शासकीय सुट्टी वगळुन) या कार्यालयातुन जाहीरातीच्या दिनांकापासून विहित कालावधीत फॉर्म फी रु.२५०/- (अक्षरी रुपये दोनशे पन्नास फक्त) स्विकारुन उमेदवारास शासकीय पावती द्यावी.
प्रत:-१) मा.सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई यांना माहितीस्तव सादर.
२) मा.आयुक्त,(वैद्यकीय शिक्षण) संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांना माहितीस्तव सादर.

Scanned by CamScanner